भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील श्री.ना.स.गुठले यांना उप अभियंता (यां) पदावरील पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन आदेश क्रमांकः आपना-२०१५/प्र.क्र.१३९/पापु १५

सातवा मजला, गो.ते.रुग्णालय इमारत संकुल, क्रॅाफर्ड मार्केट जवळ,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई.
तारीख: २३ जानेवारी, २०१८

वाचा:

१) **शासन परिपत्रक क्रमांकः** एसआरव्ही-२००२/प्र.क्र.२/२००२/१२, दि.०६/०६/२००२

२) **मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणातील** मूळ अर्ज.क्र.६२२/२०११ प्रकरणी पारीत केलेले आदेश दि.१३/०१/२०१५

३) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः** एस.आर.व्ही.-२०१५/व्हि.आय.पी. २१०/प्र.क्र.४१२/का-१२, दि.२१/०८/२०१५

शासन आदेश:

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील श्री.ना.स.गुठले यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मानीव दिनांक मिळण्याकरीता मूळ अर्ज क्रमांक ६२२/२०११ दाखल केला होता. या याचिकेवर मा.न्यायाधिकरणाने दि.१३ जानेवारी, २०१५ रोजी अंतिम आदेश पारीत करुन अर्जदार श्री.गुठले यांना दि.०१ जानेवारी, १९९८ पासून पुढील ज्येष्ठता सूच्यांमध्ये ते विभागीय परीक्षा पास झालेल्या दिनांकानुसार त्यांना ज्येष्ठतेचा क्रमांक देण्याबाबत व अर्जदाराने मानीव दिनांक देण्यासाठी सादर केलेले अभिवेदन निकाली काढण्याबाबत आदेशित केले आहे.

०२. श्री.ना.स.गुठले यांनी शाखा अभियंता पदावरील विभागीय परीक्षा सन १९९७ साली उत्तीर्ण केली आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील श्री.एस.टी.बशिरे हे विभागीय परीक्षा उत्तीर्ण न होता त्यांनी वयाची ४५ वर्षे पुर्ण केल्याने विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सन २००२ साली सूट देण्यात आली तर यंत्रणेतील श्री.बी.बी.लोंढे यांनी सन २००३ साली विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली असल्याने श्री.ना.स.गुठले यांनी श्री.एस.टी.बशिरे व श्री.बी.बी.लोंढे यांना उप अभियंता (यां) पदावर पदोन्नती दिलेला दि.१४/०८/१९९७ हा दिनांक मानीव दिनांक म्हणून देण्याची विनंती केली होती.

०३. सर्वश्री बशिरे व लोंढे यांना दिलेली उप अभियंता (यां) पदावरील पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने व ती नियमित झालेली नसल्याने सर्वश्री बशिरे व लोंढे यांचे नाव उप अभियंता (यां) संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीत समाविष्ट करणे उचित नसल्याने दि.२२/०२/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या उप अभियंता (यां) संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीमधून त्यांची नावे वगळण्यात आली असून त्यांच्या नावाचा समावेश दि.२२/०२/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या शाखा अभियंता संवर्गाच्या ज्येष्ठता सूचित करण्यात आला आहे.

०४. सर्वश्री बशिरे व लोंढे यांचे नाव उप अभियंता (यां) संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीमधून वगळण्यात आलेले असल्याने श्री.गुठले यांना उप अभियंता (यां) संवर्गातील ज्येष्ठतेचा मानीव दिनांक देताना सर्वश्री बशिरे व लोंढे यांना उप अभियंता पदावर दिलेल्या पदोन्नतीच्या दिनांकाचा विचार करण्यात आला नाही. उप अभियंता (यां) पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार श्री.ना.स.गुठले हे उप अभियंता (यां) पदावर पदोन्नतीस दि.१०/०७/१९९८ रोजी पात्र होत असल्याने तसेच सन १९९७-९८ च्या निवडसूची वर्षात अनुसूचित जाती प्रवर्गातील १ पद उप अभियंता (यां) संवर्गात उपलब्ध होत असल्याने श्री.ना.सी.गुठले यांना उप अभियंता (यां) पदावरील दि.१०/०७/१९९८ हा मानीव दिनांक म्हणून मंजुर करण्यात येत आहे.

०५. श्री.ना.स.गुठले यांना मंजुर करण्यात आलेला उप अभियंता (यां) पदावरील मानीव दिनांक हा मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन तसेच मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या रिट याचिका क्र.२९८२/२०००, २९८६/२०००, ४९५८/२००३ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. तसेच सदर पदावरील मानीव दिनांक हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

०६. श्री.ना.स.गुठले यांना उप अभियंता (यां) पदावर दिलेला मानीव दिनांक हा सेवाज्येष्ठता व वेतननिश्चितीसाठी ग्राह्य धरण्यात यावा. श्री.ना.स.गुठले यांची काल्पनिक वेतननिश्चिती उप अभियंता (यां) पदावर मंजुर केलेला दि.१०/०७/१९९८ या मानीव दिनांकापासून करुन त्याचा प्रत्यक्ष लाभ त्यांना उप अभियंता (यां) पदावरील प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारल्याचा दिनांकापासून अनुज्ञेय राहील. तथापि, काल्पनिक वेतननिश्चिती केलेल्या कालावधीतील वेतन व भत्त्यांची थकबाकी, श्री.गुठले यांना अनुज्ञेय राहणार नाही.

०७. सदरहू शासन आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२६१/१७, साप्रवि-१२, दि.३०/१०/२०१७ व अनौपचारिक संदर्भ क्र.९६१/का-१२ दि.१८/०८/२०१७ तसेच वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.५०७/१७/सेवा-३ दि.१२/१२/२०१७ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११८१०४१३६९१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2018.01.23 17:25:26 +05'30'

(चेतन निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.ना.स.गुठले, वरिष्ठ खोदन अभियंता, प्रादेशिक उपसंचालक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक विभाग, नाशिक.

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजी नगर, पुणे.
२. उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १२/१६-ब), मंत्रालय, मुंबई.
३. उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता)
५. प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक विभाग, नाशिक.
६. सहाय्यक संचालक (म.वि.व ले.से.) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
८. निवडनस्ती (पापु १५)